जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१८/1016
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 14 /०२/२०१८

प्रति,

संस्थाचालक/प्राचार्य,
सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषय:- संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुन - २०१८**
विद्यार्थ्यांची ऑनलाईन (ONLINE) नोंदणी करणेबाबत..

संदर्भ:- या कार्यालयाचे जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/३७५५, दि.२७/०६/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणा कळविण्यात येते की, संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी राज्यातील ज्या शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थांना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्फत मान्यता मिळालेली आहे आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून ई-प्रमाणपत्र (संगणक टायपिंग सांकेतांक क्रमांक) प्राप्त झाले आहे. अशा संस्थांमधून जानेवारी २०१८ ते जून २०१८ या सत्रासाठी प्रवेशित झालेल्या उमेदवारांची मराठी, हिंदी, इंग्रजी ३० श.प्र.मि. व ४० श.प्र.मि. या विषयांसाठी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी दि.१५/०२/२०१८ ते १५/०३/२०१८ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरावी. संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. संगणक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र जनरल रजिस्टर ठेवण्यात यावे.

ई-प्रमाणपत्र प्राप्त संस्थांनाच या सत्रासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल आणि प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करता येईल. विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल. संकेतस्थळावर संस्थांनी नोंदणी केलेल्याच विद्यार्थ्यांचीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येतील याची नोंद घ्यावी.

सर्व संस्थाचालकांनी परीक्षार्थींची ऑनलाईन नोंदणी करताना विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक नोंदवावा आणि प्रती विद्यार्थी नोंदणी शुल्क रु.१००/- परिषदेच्या खाली दिलेल्या बँक खाते क्रमांकावर ऑनलाईन पध्दतीने भरावे.

| | |
|---|---|
| बँकेचे नाव :- | HDFC BANK LTD , KARVE NAGAR, PUNE |
| बँक खाते क्रमांक :- | 50100226736250 |
| बँक IFSC कोड :- | HDFC0001115 |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत :-

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक, मुंबई (उ/द/प)

Jan-18/LETTER